## प्रेसनोट

जा.क्र. २३९ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :– ८/०५/२०१८

### '' जबरी चोरी करणाऱ्या सराईत आरोपींना वेगवेळया ५ गुन्हयात सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा''

पोलीस ठाणे भंडारा अंतर्गत शहाराचे वेगवेगळया ठिकाणी आरोपी नामे १) निकुंज उर्फ निक्की रमेश साधवाणी, वय २३ वर्ष, रात्र दलोली ता. कामठी जिल्हा नागपुर, २) आकाश राष्ट्पाल देशपांडे, वय २१ वर्ष रा. आंबेडकरनगर, कळमना रोड कामठी, ता. कामठी जिल्हा नागपुर यांनी माहे जुलै ते नोव्हेंबर २०१६ मध्ये भंडारा शहरात वेगवेगळया ठिकाणी महिलांना एकटे पाहुन त्यांचे शरीरावरील सोन्याचे दागिने जबरीने चोरून नेल्याचे आरोप सिध्द झाल्याने दिनांक ४.०५.२०१८ रोजी जिल्हा विशेष न्यायदंडाधिकारी भंडारा श्रीमती एस. आर. शर्मा यांनी आरोपींना प्रत्येक गुन्हयात ३ वर्ष सश्रम कारावास व प्रत्येक गुन्हयात १००००/– रूपये द्रव्यंडाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक २०.७.२०१६ ७.०८.२०१६, ४.०९. २०१६, २६.०९.२०१६, २१.११.२०१६ ला दोन्ही जबरी चोरींचे सराईत आरोपीतांनी भंडारा शहरात मोटार सायकल क्र. एम. एच. ४० अेअे ७४२२ ने येवुन, रोडने पायी येणाऱ्या जाणाऱ्या महिलांना एकटे पाहुन व त्यांचे सोबत सक्षम पुरूष व्यक्ती नसल्याचे खात्री करून महिलांचे जवळुन जावुन महिलांचे अंगावरील मुल्यावन सोन्याचे दागिने पाहुन जबरीने चोरी करून मोटार सायकलने पळुन जात असत. अशा प्रकारचे पोलीस ठाणे भंडारा येथे वेगवेगळया महिला तक्रारदार यांनी तक्रारी नोंदविल्यावरून अज्ञात आरोपी विरूध्द पोलीस ठाणे भंडारा अप. क्र. १८४/१६, २०५/१६, २०८/१६, २२७/१६, २५४/१६ कलम ३९२,३४ भादवि अन्वये नोंद केल्या गेले.

सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक कमलेश सोनटक्के स्था.गु.शा. भंडारा यांनी तपास सुरू करून गुन्हयात चोरी गेलेली १,७५,००० रूपये ची मालमत्ता व आरोपींना

शोधण्याकरीता अतिशय कुशल पध्दतीने माहिती काढुन गुन्हयात आरोपी नामे १) निकुंज उर्फ निक्की रमेश साधवाणी, वय २३ वर्ष, रात्र दलोली ता. कामठी जिल्हा नागपुर, २) आकाश राष्ट्पाल देशपांडे, वय २१ वर्ष रा. आंबेडकरनगर, कळमना रोड कामठी, ता. कामठी जिल्हा नागपुर यांना अटक करून संपुर्ण गुन्हयातील मालमत्ता हस्तगत केली व साक्षपुरावे गोळा केले. दोन्ही आरोपीतां विरूध्द दोषारोप पत्र प्रथम श्रेणी, न्यायालय भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ३१/१७, ३३/१७, ३४/१७, ३५/१७, ३६/१७ अन्वये जिल्हा विशेष न्यायदंडाधिकारी भंडारा यांचे समक्ष सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **जिल्हा विशेष न्यायदंडाधिकारी भंडारा श्रीमती एस. आर. शर्मा** यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री. विठ्ठल तामगाडगे, सरकारी अभियोक्ता**, जिल्हा विशेष न्यायदंडाधिकारी भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. दिनांक ४.०५.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी नामे १) निकुंज उर्फ निक्की रमेश साधवाणी, वय २३ वर्ष, रात्र दलोली ता. कामठी जिल्हा नागपुर, २) आकाश राष्ट्पाल देशपांडे, वय २१ वर्ष रा. आंबेडकरनगर, कळमना रोड कामठी, ता. कामठी जिल्हा नागपुर** यांचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३९२,३४ भादवि अन्वये प्रत्येक गुन्हयात ३ वर्ष सश्रम कारावास व १००००/-- रूपये दंड, दंड न भरल्यास ३ महिणे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली.** सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, रविंद्र मानकर, ठाणेदार पोलीस ठाणे भंडारा यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार, गजानन गिते व पो.ना. दहिवले यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

**महाराष्ट् पोलीस दल, जिल्हा भंडारा तसेच सरकारी अभियोक्ता वर्ग जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा तर्फे जनतेस निर्भीड पणे गुन्हयाचे दोषसिध्दी करीता व महिलांवरील अत्याचार रोखण्याकरीता पोलीसांना पंच व साक्षदार म्हणुन सहकार्य करण्याचे जाहिर आवाहन करण्यात येत आहे.**

(एस. बी. ताजणे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
दुरध्वनी क्र.०९५४५९९७०२५

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.